# तपासणी यादी

1. ओळखीचा पुरावा :- निवडणूक ओळखपत्र / पारपत्र / वाहनचालनाची अनुज्ञप्ती/ पॅन कार्ड / कंपनी असल्यास सध्याच्या बँकेकडील मालक / भागीदार / संचालकाच्या सहीच्या नमुन्याची ओळख
2. राहण्याच्या पत्त्याचा पुरावा कंपनी असल्यास मालक / भागीदार / संचालकाचे अलीकडील टेलिफोन बिल, विजेचे बिल, मालमत्ता कराची पावती,/ पारपत्र / निवडणूक ओळखपत्र.
3. व्यावसायिक पत्त्याचा पुरावा
4. अर्जदाराचे कुठल्याही बँकेकडे / वित्तीय संस्थेकडे थकीत देणे नसावे
5. मेमोरँडम ऑफ असोसिएशन, आर्टीकल्स ऑफ असोसिएशन, भागीदारी करार इ.
6. अर्जदार व जामीनदार यांच्या अलीकडील आयकर विवरण पत्रासह त्यांच्या मालमत्ता व देणी यांचे विवरण.
7. (व्यावसायिक जागा भाड्याची असल्यास भाडे करार. तसेच लागू होत असल्यास प्रदूषण नियंत्रण बोर्डाची परवानगी.
8. लागू असल्यास एस. एस. आय. / एमएसएमइ नोंदणी
9. खेळते भांडवल हवे असल्यास प्रकल्पाचा पुढील दोन वर्षांचा ताळेबंद आणि मुदतीचे कर्ज हवे असल्यास कर्ज फेडीच्या वर्षापर्यंतचा ताळेबंद
10. प्राथमिक व संलग्न तारण म्हणून ठेवाल्या जाणाऱ्या सर्व मालमत्तांचे लीज डीड / टायटल डीड.
11. लागू असल्यास अर्जदार अ. जा. / अ. ज. प्रवर्गातील असल्याचा पुरावा.
12. अ. जा. / अ. ज. / महिला प्रवर्गातील व्यक्तीकडे कंपनीचे नियंत्रण बहुसंख्येने असल्याचे सिद्ध करणारे रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडील प्रमाणपत्र .

**२५ लाखांवरील जोखीम असणाऱ्या प्रकरणांबाबत**

13. व्यवसाय घटकाची माहिती (प्रवर्तकांची नावे, कंपनीचे इतर संचालक, व्यवसायात केल्या जाणाऱ्या प्रक्रिया, सर्व कार्यालये व कारखान्यांचे पत्ते, शेअर होल्डिंग चे स्वरूप इ.
14. संलग्न / गट कंपन्यांचे (असल्यास) मागील तीन वर्षांचे ताळेबंद
15. प्रकल्प अहवाल (जर प्रस्तावित प्रकल्पाला मुदतीचे कर्ज हवे असेल तर) ज्यात विकत घेण्याच्या यंत्रसामग्रीची माहिती, कोणाकडून विकत घेणार, कपॅसिटी वापराची माहिती, उत्पादन, विक्री, मुदत कर्जाच्या मुदतीपर्यंतचे अंदाजित नफा-तोटा पत्रक, कामगारांची माहिती, नोकरीवर ठेवल्या जाणाऱ्या कर्मचार्यांची माहिती, या वित्तीय अंदाजांचा आधार इ.
16. लागू असेल तर उत्पादन प्रक्रिया, कंपनीच्या महत्वाच्या अधिकार्यांविषयी माहिती, कोणाबरोबर व्यावसायिक सहबद्धता असेल तर त्याबद्दल माहिती, कच्चा माल व त्याचे पुरवठादार, ग्राहकांची माहिती, प्रमुख स्पर्धकांची माहिती आणि स्पर्धकांच्या तुलनेत कंपनीची बलस्थाने व कमजोरी, यांची माहिती.

.

*(ही यादी फक्त सूचक आहे, सर्वसमावेशक नाही आणि विविध ठिकाणच्या स्थानिक परिस्थितीवर अवलंबून त्यात गरजेप्रमाणे अधिक माहिती द्यावी.)*

*****